R.No. MHAMAR/25/A3029

R.No. MHHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : ६१

दि.१४ फेब्रुवारी २०२६,वारः शनिवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

## लातूर पोलिसांची शांतता समितीची बैठक संपन्न

लातूर :-१२ फेब्रुवारी २०२६ रोजी लातूर पोलीस यांच्या वतीने आगामी विविध धर्मीय सण-उत्सव शांततेत, उत्साहात व निर्विघ्नपणे पार पडावेत यासाठी शांतता समितीची महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठक पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे यांच्या अध्यक्षतेखाली पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर येथील मीटिंग हॉलमध्ये पार पडली.



या बैठकीस अपर पोलीस अधीक्षक श्री. मंगेश चव्हाण, जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, लातूर शहरातील पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी, विविध शाखांचे प्रभारी अधिकारी तसेच सर्व जाती-धर्मातील प्रतिष्ठित नागरिक, व्यापारी, समाजसेवक, विविध मंडळे व समित्यांचे अध्यक्ष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीदरम्यान श्री छत्रपती शिवाजी महाराज जयंती, महाशिवरात्री,जय सेवालाल जयंती, रमजान महिना व रमजान ईद, होळी, धुलीवंदन, रंगपंचमी तसेच इतर साजरे होणारे सर्वधर्मीय सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था स्थितीचा सखोल आढावा घेण्यात आला. संवेदनशील भागांचे विश्लेषण, मिरवणुकांचे मार्ग, धार्मिक स्थळांची सुरक्षा, वाहतूक नियंत्रण, सोशल मीडिया देखरेख व अतिरिक्त बंदोबस्त यासंदर्भात स्पष्ट सूचना देण्यात आल्या. तसेच उपस्थित सर्व शांतता समिती सदस्य व इतर मान्यवर यांच्या अडीअडचणी समजून घेऊन त्यावर उपाययोजना करण्याबाबत आश्वस्त करण्यात आले.

पोलीस अधीक्षक श्री अमोल तांबे यांनी बैठकीच्या पार्श्वभूमीवर बैठकीस उपस्थित असलेल्या सर्व शांतता समिती सदस्य व इतर मान्यवरांना संबोधित करून लातूर शहर हे सुसंस्कृत, सर्वधर्मसमभाव जपणारे शहर असून महाराष्ट्रामध्ये लातूर शहराची वेगळी सुसंस्कृतपणाची ओळख आहे. त्यामुळे सर्वांनी आपल्या लातूर जिल्ह्याच्या प्रगती व उन्नतीसाठी तसेच लातूरचा सुसंस्कृतपणा अबाधित ठेवण्यासाठी प्रशासनास योग्य असे सहकार्य करून लातूर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्थेची कठोर अंमलबजावणी होऊन शांतता प्रस्थापित होण्यासाठी सर्वांनी सजगपणे प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन केले.

पोलीसांकडून करण्यात आलेल्या प्रमुख उपाययोजना.

खसंवेदनशील ठिकाणी फिक्स पॉईंट बंदोबस्त.

खजीप पेट्रोलिंग व पायी गस्त वाढविणे.

खगुड मॉर्निंग स्कॉड सतर्क ठेवणे.

खएसआरपीएफ प्लाटून, ९६० पुरुष होमगार्ड व १५० महिला होमगार्ड यांची नेमणूक.

खप्रमुख मशिदी, ईदगाह व कब्रस्तान परिसरात बंदोबस्त.

खवाहतूक नियोजन व पर्यायी मार्गांची आखणी.

खअफवा पसरविणाऱ्यांवर कठोर कारवाई

खसोशल मीडिया विशेष मॉनिटरिंग सेल कार्यरत.

खअवैध मद्यविक्री व इतर गैरप्रकारांवर विशेष मोहिम.

खनाकाबंदी व रात्रीची गस्त वाढविण्यात येणार.

खमहिला सुरक्षा पथक सक्रिय करण्यात आले आहेत.

खमहाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (१) (३) अंतर्गत आवश्यकतेनुसार अधिसूचना.

खमहत्वाच्या पुतळे, मंदिरे, मशिदी व धार्मिक स्थळांवर विशेष बंदोबस्त.

खडीजे व ध्वनीप्रदूषणासंदर्भात वेळ व ध्वनीमर्यादेचे काटेकोर पालन.

शांतता समितीच्या बैठकीत सर्व धर्मीय प्रतिनिधींनी सण-उत्सव शांततेत व बंधुभावाने पार पाडण्याचा ठाम निर्धार व्यक्त केला. कोणत्याही अफवा, भडकावू संदेश किंवा समाजविघातक प्रवृत्तींना थारा दिला जाणार नाही, असे एकमताने नमूद करण्यात आले. पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे यांनी अध्यक्षीय भाषणात नागरिकांना प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन केले तसेच लातूर पोलीस दल हे सर्व सण-उत्सव कायदा व सुव्यवस्था अबाधित राखून यशस्वीरित्या पार पाडण्यास पूर्णतः सक्षम असल्याचा विश्वास व्यक्त केला.

## भारतीय संस्कृतीची जोपासना करणे काळाची गरज - प्रा. मधुकर क्षीरसागर




मुरुड/ महेंद्र आल्टे : येथील संभाजी महाविद्यालयात मकर संक्रांतीनिमित्त सांस्कृतिक विभागाच्या वतीने 'साडी धोती डे' चे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक काळम होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून क्रीडा विभागाचे प्रा. मधुकर क्षीरसागर उपस्थित होते. यावेळी मंचावर सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. डॉ. बी.एम.गोरे, प्रा. सौ. पी.बी. महाजन उपस्थित होते. यावेळी बोलताना प्रा. क्षीरसागर म्हणाले की, मकर संक्रांती हा भारतीय संस्कृतीतील एक महत्त्वाचा सण आहे. या दिवशी सूर्य मकर राशीत प्रवेश करतो आणि उत्तरायणाची सुरुवात होते, म्हणून हा दिवस शुभ मानला जातो. हिवाळ्याचा शेवट आणि नव्या ऋतूची चाहूल यामुळे कृषीजीवनातही या सणाला विशेष स्थान आहे. महाराष्ट्रात तिळगुळ देऊन तिळगुळ घ्या, गोड गोड बोला असा संदेश दिला जातो, ज्यातून मैत्री, सौहार्द आणि आपुलकी वाढवण्याचा हेतू असतो. या दिवशी पवित्र स्नान, दानधर्म, सूर्यपूजा आणि पतंग उडविणे अशा विविध परंपरा पाळल्या जातात. तिळ व गुळाचे सेवन आरोग्यास हितकारक मानले जाते. मकर संक्रांती हा सण सामाजिक एकात्मता, कृतज्ञता आणि सकारात्मकतेचा संदेश देतो. निसर्ग, सूर्य आणि परंपरा यांचा सन्मान करत लोकांमध्ये आनंद व बंधुभाव दृढ करणारा हा सण भारतीय जीवनपद्धतीचा अविभाज्य भाग असुन भारतीय संस्कृतीचे जतन करणे काळाची गरज आहे. तसेच १५ जानेवारी हा भारताचे प्रसिद्ध कुस्तीपटू खाशाबा जाधव यांचा जन्मदिन असल्यामुळे त्यांच्या कार्याचा आढावा घेतला. भारतीय क्रीडाक्षेत्रातील प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व असून देशाच्या क्रीडाइतिहासात त्यांचे स्थान अत्यंत मानाचे आहे असे प्रा. क्षीरसागर म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. धाबेकर यांनी केले. तर आभार प्रा. पाटोळे ए.आर. यांनी मानले. कार्यक्रमास मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी झाले होते.

## अनुष्का पाटोळेला न्याय मिळवून देण्यासाठी सोमवारी लातूरात मोर्चा

लातूर - लातूर जिल्ह्यातल्या औसा तालुक्यातील टाका येथील मातंग समाजाची ११ वर्षाची मुलगी कुमारी अनुष्का पाटोळे ही लातूरच्या नवोदय विद्यालयात इयत्ता सहावी मध्ये शिकत होती .या विद्यार्थ्यांनीची या विद्यालयातील कर्मचाऱ्यांनी संगमत करून हत्या केली आहे .हा खून लपविण्यासाठी त्यांच्याकडून आत्महत्येचा बनाव करण्यात आला आहे .या नवोदय विद्यालयाचे अध्यक्ष जिल्हाधिकारी असल्याने पोलीस आणि प्रशासकीय अधिकारी हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न करीत आहेत . त्यामुळे या अन्यायाविरुद्ध दलित -मातंग समाजात प्रचंड असंतोष पसरला आहे .हा असंतोष व्यक्त करण्यासाठी आणि अनुष्काला न्याय मिळवून देण्यासाठी लातूर जिल्ह्यातील सकल मातंग समाजाच्या वतीने लातूरच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढण्यात येणार आहे .मातंग समाजाचे नेते जी .ए. गायकवाड आणि सुरेश चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली सोमवार दिनांक १६ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी १२ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयावर निघणारा हा मोर्चा लातूर शहरातील साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याला अभिवादन करून मुख्य रस्त्याने ि धिकारी कार्यालयावर( जुनी इमारत) धडकणार आहे .या मोर्चात बहुजन-दलित -मातंग समाजातील महिला पुरुषानी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे .असे आवाहन या मोर्चाचे आयोजक पिराजी साठे ,सुनील सौदागर ,आनंदभाई वैरागे ,प्रा.राजेंद्र लोदगेकर ,राज क्षीरसागर आणि अन्य कार्यकर्त्यांनी केले आहे.

## महाबोधी विहार मुक्तीसाठी दिल्लीमध्ये प्रचंड गर्जना; लातूरच्या भारतीय बौद्ध महासभेच्या कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त सहभाग

लातूर/प्रतिनिधी:-दि. १२ फेब्रुवारी २०२६ रोजी भारतीय बौद्ध महासभा जिल्हा शाखा लातूर पश्चिमच्या वतीने दिल्ली येथे आयोजित करण्यात आलेल्या बौद्ध गया, बिहार येथील महाबोधी विहार मुक्ती आंदोलनात मोठ्या संख्येने सहभाग नोंदविण्यात आला. या आंदोलनाचे नेतृत्व जिल्हा अध्यक्षा आशाताई चिकटे यांनी केले.

लातूर जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधून आलेल्या कार्यकर्त्यांनी दिल्लीतील आंदोलनात सक्रिय सहभाग घेत महाबोधी विहार बौद्ध समाजाच्या ताब्यात देण्याची जोरदार मागणी केली. बौद्ध धर्मीयांचे जागतिक पवित्र स्थळ असलेल्या महाबोधी विहाराचे व्यवस्थापन हिंदू ब्राह्मणांच्या ताब्यातून मुक्त करून ते बौद्ध समाजाकडे सोपविण्यात यावे, अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी मांडली.



यावेळी केंद्र सरकारकडे निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात महाबोधी विहाराचे संपूर्ण प्रशासन आणि व्यवस्थापन बौद्ध समाजाकडे देण्याची मागणी करण्यात आली असून, ऐतिहासिक आणि धार्मिक वारसा जपण्यासाठी तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी विनंती करण्यात आली आहे.

अध्यक्षा आशाताई चिकटे यांनी सांगितले की, महाबोधी विहार हे संपूर्ण जगातील बौद्ध बांधवांचे श्रद्धास्थान आहे. त्याचे व्यवस्थापन बौद्ध समाजाकडे असणे ही आमची रास्त आणि न्याय्य मागणी आहे. हा लढा आम्ही शांततेच्या आणि लोकशाही मार्गाने पुढे नेणार आहोत.

सदर आंदोलन शांततेत व शिस्तबद्ध पद्धतीने पार पडले. लातूर जिल्ह्यातील कार्यकर्त्यांचा सहभाग लक्षणीय ठरला असून, आंदोलन यशस्वीरित्या पूर्ण झाल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले



प्रभाग क्रमांक १ चे नूतन नगरसेवक ॲड. मनोज थोरात यांची लातूर शहर महानगरपालिका येथे निवडून आल्याबद्दल थेरगाव पुणे येथील विशाल साकळे व प्रकाश थोरात यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी अशोक हनवते (संपादक, दैनिक महावृत्त तथा जिल्हा सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई जिल्हा शाखा लातूर), अतुल थोरात, संभाजी धावारे आदी उपस्थित होते.

## बौद्ध समाजातील सांस्कृतिक, शैक्षणिक व सामाजिक संस्थांसाठी अनुदान योजना

लातूर :- अल्पसंख्यांक विकास विभागामार्फत २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरिता बौद्ध समाजातील सांस्कृतिक, शैक्षणिक व सामाजिक कार्य राबविणाऱ्या संस्थांना पायाभूत सोयी-सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना राबविण्यात येत आहे. इच्छुक संस्थांनी विहित नमुन्यातील अर्ज सर्व आवश्यक कागदपत्रांसह लातूर जिल्हा नियोजन अधिकारी कार्यालयाकडे २० फेब्रुवारी २०२६ पर्यंत सादर करावेत, असे जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहेराज्यातील धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत आणि संस्थेमध्ये ५१ टक्क्यांपेक्षा अधिक बौद्ध समाजातील विश्वस्त, सदस्य असलेल्या संस्थांसाठी महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्यांक विकास विभागामार्फत २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरिता बौद्ध समाजातील सांस्कृतिक, शैक्षणिक व सामाजिक कार्य राबविणाऱ्या संस्थांना पायाभूत सोयी-सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत पात्र संस्थांना सांस्कृतिक, शैक्षणिक आणि सामाजिक कार्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा उभारणीसाठी शासनाकडून आर्थिक मदत देण्यात येणार आहे. या योजनेचा उद्देश राज्यातील बौद्ध समाजातील संस्थांचा सर्वांगीण विकास साधणे हा आहे. संस्था राज्यातील धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत असणे आणि संस्थेतील ५१ टक्क्यांपेक्षा अधिक विश्वस्त तथा सदस्य बौद्ध समाजातील असणे आवश्यक आहे. योजनेबाबतचे सविस्तर निकष, अटी व शर्ती महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. अविवि-२०२४/ प्र.क्र.७५/१५/का.६, दिनांक ०७ ऑक्टोबर २०२४ मध्ये उपलब्ध आहेत.

# जेफ्री एफस्टीन प्रकरण : सत्तेच्या अभेद्य कवचाला लागलेली तडे

अमेरिकेतील वित्तीय क्षेत्रातून झपाट्याने पुढे आलेल्या गशषषीशू एँीिंशिळप या व्यक्तीचे नाव आज जागतिक स्तरावर गुन्हेगारी, सत्तेचा गैरवापर आणि न्यायव्यवस्थेतील त्रुटी यांचे प्रतीक बनले आहे. एका अब्जाधीश वित्तीय सल्लागारापासून ते प्रभावशाली राजकारणी, उद्योगपती आणि शास्त्रज्ञांच्या निकटवर्तीयांपर्यंतचा त्याचा प्रवास जितका वेगवान होता, तितकाच त्याचा पतनही धक्कादायक ठरला. परंतु या प्रकरणाचा खरा प्रश्न एका व्यक्तीपुरता मर्यादित नाही; तो संपूर्ण व्यवस्थेच्या विश्वसनीयतेशी निगडित आहे.

आरोपांची गंभीरता आणि सामाजिक धक्का

एफस्टीनवर अल्पवयीन मुलींच्या लैंगिक शोषणाचे आणि मानवी तस्करीचे गंभीर आरोप होते. अनेक पीडितांनी पुढे येत आपले अनुभव सांगितले. पैशाचे आमिष, प्रभावशाली ओळखी आणि दबावाच्या वातावरणात हे सर्व घडल्याचे त्यांनी नमूद केले. या साक्षींनी केवळ एका गुन्हेगाराचे नव्हे, तर सत्तेच्या सावलीत वाढलेल्या अनैतिक जाळ्याचे चित्र उभे केले.

गुन्हेगारीचे स्वरूप हे वैयक्तिक विकृतीपलीकडे जाऊन संघटित स्वरूपाचे असल्याचे संकेत मिळत होते. त्यामुळेच या प्रकरणाकडे जागतिक माध्यमांचे आणि समाजाचे लक्ष वेधले गेले.

२००८ मधील वादग्रस्त करार

२००८ साली फ्लोरिडामध्ये झालेला 'प्लिया डील' हा या प्रकरणातील सर्वात मोठा वादाचा मुद्दा ठरला. गंभीर आरोप असूनही एफस्टीनला तुलनेने सौम्य शिक्षा झाली आणि त्याला विशेष सवलती देण्यात आल्या. सामान्य आरोपींना न मिळणाऱ्या सुविधा त्याला मिळाल्या, ही बाब लोकशाहीतील समानतेच्या तत्त्वाला धक्का देणारी होती.

हा करार न्यायव्यवस्थेतील पारदर्शकतेबाबत प्रश्न निर्माण करणारा ठरला. पैसा आणि प्रभाव यांच्या जोरावर कायद्याला वाकवता येते का, हा प्रश्न तेव्हापासूनच उपस्थित झाला.

२०१९ ची अटक आणि संशयास्पद मृत्यू

२०१९ मध्ये न्यूयॉर्कमध्ये एफस्टीनला पुन्हा अटक करण्यात आली. आरोप अधिक व्यापक होते आणि तपासाचा कक्षही मोठा होता. मात्र अटकेनंतर काही आठवड्यांतच कारागृहात त्याचा मृत्यू झाला. अधिकृतरीत्या आत्महत्या असे घोषित करण्यात आले, परंतु कारागृहातील सुरक्षेतील त्रुटींमुळे संशय निर्माण झाला.

या मृत्यूमुळे अनेक प्रश्न कायमचे अनुत्तरित राहिलेत्याच्या संपर्कातील प्रभावशाली व्यक्तींची भूमिका काय होती? कोणत्या पातळीवर संरक्षण मिळाले? सत्य पूर्णपणे समोर आले का? या प्रश्नांवर अद्याप चर्चा सुरू आहे.

सहकारी आणि न्यायाची प्रक्रिया

एफस्टीनची निकट सहकारी ऋह्लळीश्ररळपश चरुशश्रश्र हिच्यावर खटला चालवून तिला शिक्षा सुनावण्यात आली. हा न्यायप्रक्रियेचा एक टप्पा असला, तरी संपूर्ण जाळ्याचा उलगडा झाला का, याबद्दल शंका कायम आहेत.

न्यायव्यवस्थेची खरी कसोटी केवळ शिक्षा देण्यात नसते, तर संपूर्ण सत्य समाजासमोर आणण्यात असते. अन्यथा, न्याय अपुरा राहतो.

माध्यमांची भूमिका आणि लोकशाहीचा धडा

या प्रकरणात स्वतंत्र पत्रकारितेची भूमिका महत्त्वाची ठरली. काही तपासात्मक अहवालांमुळेच २००८ नंतर दडपल्या गेलेल्या प्रकरणाला नव्याने उभारी मिळाली. यामुळे माध्यमांचे स्वातंत्र्य आणि त्यांची जबाबदारी पुन्हा अधोरेखित झाली.

एफस्टीन प्रकरणाने लोकशाही व्यवस्थेला एक स्पष्ट संदेश दिलाकायद्यापुढे सर्व समान असले पाहिजेत. जर प्रभावशाली व्यक्तींना विशेष वागणूक मिळत असेल, तर जनतेचा विश्वास ढळतो. लोकशाहीची पायाभरणी ही केवळ निवडणुकांवर नव्हे, तर न्यायाच्या समतोल अंमलबजावणीवर टिकून असते.

निष्कर्ष

जेफ्री एफस्टीन प्रकरण हे केवळ एका व्यक्तीच्या गुन्ह्यांची कथा नाही; ते सत्तेच्या दुरुपयोगाची आणि व्यवस्थेतील कमकुवत दुव्यांची जाणीव करून देणारे प्रकरण आहे. या घटनाक्रमातून जगभरातील न्यायप्रणाली, राजकीय नेतृत्व आणि समाजाने धडा घ्यावा.

पारदर्शकता, जबाबदारी आणि पीडितांना न्यायही तीन तत्त्वे दृढ केली गेली, तरच अशा घटनांची पुनरावृत्ती रोखता येईल. अन्यथा, सत्तेच्या आड दडलेले अंधार पुन्हा पुन्हा लोकशाहीच्या प्रकाशाला गिळंकृत करतील.

# आठवणींची चादर ओढून प्रेमाच्या विश्वात वावरताना...

भावनांचा चाललेला कोलाहल मी शब्दात मांडतो. साचू नये मेंदूत कचरा म्हणून शब्दांनी निचरा करतो. मात्र काय करावे कळत नाही? कारण आतून शब्दांचे झरे फुटायला लागतात. अनवरत वाहतात भावना... थांबवता थांबत नाही. शब्दांच्या आश्रयाने होतात मुक्त... मात्र, आता वाटते जावे थोडे मौनात... गाठावा एकांत जिथे मनाची नसावी चलबिचल...निर्विचार, निर्विकार होऊन बघावे केवळ साक्षी बनून स्वतःला... प्रत्येक ये, जा करणारा श्वास अनुभवत...

'व्हॅलेंटाईन डे' साजरा करावा की नाही याविषयी बरेच मतभेद आहेत. प्रेम हे अंतरात्म्यातून फुलणारी एक तरल भावना आहे. अशा प्रेमाला व्यक्त होण्यासाठी 'प्रदर्शनाची किंवा स्पेशल डे' ची गरजच काय? शिवाय भारतीय संस्कृतीत इतके सणवार असताना अशा पाश्चात्य डे ची आवश्यकताच नाही असे विविध विचार प्रवाह आहेत नाही का? परंतु प्रेमाला फुलण्यासाठी, व्यक्त होण्यासाठी जो वेळ द्यावा लागतो तो असायला हवा ना...

आजच्या धकाधकीच्या जीवनात जीवन इतके गतिमान झाले आहे की, 'लाजून हसणे अन् हसून पहाणे' अशा गोष्टींसाठी वेळच नाही. त्यामुळे एकमेकांना ओळखायला, प्रेम व्यक्त करायला असे 'व्हॅलेंटाईन डे' चे निमित्त शोधले जाते. या निमित्ताने का होईना पण यंत्रमय व रुक्ष होत चाललेल्या जीवनरुपी वृक्षावर प्रेमाची पालवी फुटते. पाश्चात्यांचे अधानुकरण करणे किंवा त्यांना तिव्र विरोध करत संस्कृतीची चौकट बंदिस्त करणे या दोन्ही गोष्टी म्हणजे एकदम टोक गाठणे झाले असे होणार नाही का? अशावेळी अशा नवीन 'डे'ज ना आपण आपल्या संस्कृतीत सामावून घेऊन आपल्या संस्काराचा रंग या पिढीच्या संकल्पनांना दिला तर... संस्कृतीच्या चौकटीची कक्षा रुंद केली तर...

खरं तर प्रेम व्यक्त करण्यासाठी कोणत्या दिवसाची वाट पहावी लागत नाही. कारण प्रेम व्यक्त करण्यासाठी चेह-यावरची लालीदेखील पुरेशी असते. तिच्या किंवा त्याच्या चेह-यावरचे हसू, नजरेचा एक कटाक्ष प्रेमाची कबुली देण्यासाठी पुरेसा असतो. पण काळाने रुपडे पालटले त्याप्रमाणे प्रेम व्यक्त करण्याच्या कन्सेप्ट बदलल्या असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. हॅशटॅगच्या जगात भावना व्यक्त करायला नानाविविध 'डे' संस्कृती आली आहे. धावपळीच्या दुनियेत व्यक्त होण्यासाठी हे 'डे' मदत करतात. नेहमीप्रमाणे फेब्रुवारी महिना आला की तरुण तरुणींना वेध लागतात ते अशाच एका प्रेमाच्या दिवसाचे म्हणजेच 'व्हॅलेंटाईन डे' चे...

प्रेम म्हणजे एक अनोखी भावना जी आपल्या जीवनाला रंगीत बनवते. प्रेमाच्या रंगात रंगून जाणे ही एक अद्भुत अनुभूती असते. प्रेम म्हणजे एकमेकांना समजून घेणे, एकमेकांच्या खूशीत खूश असणे, एकमेकांच्या दुःखात सहभागी होणे. तसं पाहता प्रेमाचे अनेक प्रकार आहेत. त्यातील रोमँटिक प्रेम म्हणजे दोन व्यक्तींमधील आकर्षण आणि प्रेम, पारिवारिक प्रेम म्हणजे कुटुंबातील सदस्यांमधील प्रेम, मित्रत्वाचे प्रेम म्हणजे मित्रांमधील प्रेम आणि बंध नि आत्मीय प्रेम म्हणजे स्वतःच्या आत्म्याशी असलेले प्रेम.

याच प्रेमाचे काही महत्व आहेत. प्रेम आपल्या जीवनाला अर्थ देते, आपल्याला मजबूत बनवते आणि एकमेकांशी जोडते. प्रेमात पडणे म्हणजे एक अनोखी अनुभूती असते. जेव्हा आपण प्रेमात पडतो, तेव्हा आपल्या जीवनाचा एक नवीन अध्याय सुरू होतो. याच प्रेमात पडल्याचे काही चिन्हे दिसून येतात. प्रेमात पडल्यावर हृदयाची धडधड वाढते, आपल्या चेह-यावर स्मित असते, एकमेकांना पाहण्याची इच्छा असते तसेच एकमेकांशी बोलण्याची इच्छा असते. याचप्रमाणे प्रेमात पडल्याचा अनुभव स्पष्ट जाणवतो. प्रेमात पडल्यावर आपल्याला एकमेकांप्रती आदर वाटतो, एकमेकांवर विश्वास वाटतो, एकमेकांच्या जीवनात सहभागी होण्याची इच्छा असते.

तसेच या प्रेमात काही परीक्षांना सामोरे जावं लागते. प्रेमाची परीक्षा म्हणजे प्रेमात यश आणि अपयशाची कारणे. त्यातील यशाची कारणे म्हणजेच प्रेमात यशासाठी संचार, विश्वास, समजूतदारपणा आणि सहिष्णुता महत्वाचा असतो. याच गोष्टींचा अभाव हा अपयशास कारणीभूत ठरतो. प्रेम आणि विवाहातील संबंध आणि महत्त्व पाहता प्रेम अनोखा असतो. विवाह म्हणजे दोन व्यक्तींमधील एक पवित्र बंध. प्रेमाची काळजी घेणे तितकेच महत्त्वाचे असते जेणेकरून प्रेम जपले जाईल. प्रेम जपले की ते वाढीस लागेल. ज्यामुळे प्रेम यशस्वी ठरण्यास मदत होईल.

माझ्या मनात जे असते  
तेच तिच्या मनात असते  
ते जगाला दिसत नसते  
जग उगाच भ्रमात असते

**शब्दस्पर्शी-सुनील शिरपुरे**  
**कमळवेल्ली,यवतमाळ**  
**भ्रमणध्वनी-७०५७१८५४७९**

# दलितांच्या व्यथा,वेदना साहित्यातून अभिव्यक्त करत विद्रोह पेरणारा विद्रोही बंडखोर - पद्मश्री नामदेव ढसाळ

दलित अन्याय अत्याचाराची मालिका खंडित होत नाही  
स्वातंत्र्य नावाची रंडी इथं कधी नांदत नाही  
मुकी बहिरी झाली ही वांझ व्यवस्था  
आक्रोश हिला आमचा दिसत नाही

अश्या प्रखर शब्दात व्यवस्थेवर घणाघाती प्रहार करत विद्रोही बाण्याने व्यवस्थेला फाट्यावर कोलणारे विद्रोही बंडखोर,वेदना आणि विद्रोहाचे स्फूल्लिंग चेतवणारे आंबेडकरी विचारवंत,मराठी साहित्य विश्वात दलित साहित्याला नवी दिशा देत परिवर्तन घडवणारे, परिवर्तनवादी प्रातिभीक सामर्थ्य लाभलेले जेष्ठ साहित्यिक,दलित चळवळ बुलंद करण्यासाठी दलित पँथर ही विद्रोही सामाजिक संघटना संस्थापित करणारे,महानगरीय जीवनावर लिहिणारे बोली भाषेत लिखाण करणारे मराठीतील एक महत्वाचे लेखक,आपल्या शब्दांनी प्रस्थापितांच्या सत्तेला हादरा देणारे बौद्ध दलित चळवळीतील क्रांतिकारी सूर्य म्हणजे पद्मश्री नामदेव लक्ष्मण ढसाळ होत.

नामदेव ढसाळ दलित चळवळीतील एक अग्रगण्य नाव.ज्यांनी दलितांच्या व्यथा वेदना जाणल्या.नुसत्याच त्या जाणल्या नाही तर आपल्या लेखणीतून,साहित्यातून त्या व्यथा वेदना सर्वांसमोर मांडत त्याला न्याय मिळावा यासाठी त्यांनी तितक्यात ताकतीने लढा उभारला.नामदेव ढसाळ यांचा जन्म १५ फेब्रुवारी १९४९ रोजी महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यात झाला.ढसाळ यांनी साहित्यातून अन्याय अत्याचाराला वाचा फोडण्याचे कार्य केले.त्यांच्यावर महामानव,भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर तसेच शांती आणि करूणेचा संदेश देणारे तथागत गौतम बुद्ध यांचा प्रभाव होता.

नामदेव ढसाळ यांना त्यांच्या साहित्यिक योगदानाबद्दल अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलेले आहे.त्यांच्या गोलपिठा या साहित्यकृतिस महाराष्ट्र राज्य पुरस्कार मिळाला आहे.सोव्हीयत लँड नेहरू पुरस्कार, महाराष्ट्र राज्य कवी केशवसुत पुरस्कार,१९९९ मध्ये पद्मश्री पुरस्कार, बहिणाबाई चौधरी पुरस्कार, २००५ रोजी साहित्य अकादमी स्वर्ण महोत्सव निमित्त जीवनगौरव पुरस्कार,२००६ रोजी गंगाधर गाडगीळ साहित्य पुरस्कार, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्मृती पुरस्कार, बुद्ध रोहिदास विचार गौरव पुरस्कार असे अनेक पुरस्कार मिळालेले आहेत. पद्मश्री नामदेव ढसाळ यांनी साहित्य क्षेत्रातील योगदान वाखानण्याजोगे आहे. त्यांनी १९७२ साली त्यांचा पहिला कवितासंग्रह गोलपीठा प्रकाशित केला.यात त्यांनी विद्रोही बंडखोरी करत व्यवस्थेविरोधात शब्दाशब्दातुन चपराक सडकवला.त्यानंतर त्यांनी आमच्या इतिहासातील एक अपरिहार्य पात्र -प्रियदर्शनी,खेळ,तुही इयत्ता कंची, तुझे बोट धरून चाललो आहे,मी मारले सूर्याच्या रथाचे सात घोडे,गांडू बगीचा, या सत्तेत जीव रमत नाही,मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलवले,मी भयंकराच्या दरवाज्यात उभा आहे व निर्वाणा अगोदरची पिडा असे कवितासंग्रह प्रसिद्ध केले. याच बरोबर त्यांनी निगेटिव्ह स्पेस,उजेडाची काळी दुनिया व हाडकी हडवळा या तीन कादंबऱ्या देखील लिहिल्या आहेत.' अंधार यात्रा ' हे नाटक देखील त्यांनी लिहिलेले आहे.तसेच बुद्ध धर्म काही शेष प्रश्न,आंबेडकरी चळवळ,आंधळे शतक सर्व काही समष्टीसाठी असे चिंतनपर लेख ही लिहिलेले आहेत.नामदेव ढसाळ यांच्या मृत्युंनंतर त्यांचे दलित पँथर - एक संघर्ष हे चिंतनपर लेखन २०१४ साली प्रकाशित करण्यात आले.

१९७२ मध्ये त्यांनी चळवळीत काम करत असताना दलित चळवळीतील समवयस्क सहकारी तसेच साहित्यिकांच्या साथीने दलित पँथर या आक्रमक संघटनेची स्थापना केली.त्यांच्या या चळवळीवर अमेरिकेतील ब्लॅक पँथर या चळवळीचा मोठा प्रभाव होता.यां संघटनेतुन त्यांनी दलितांच्या प्रश्नांना, अन्याय अत्याचाला वाचा फोडली,दलितांच्या अनेक प्रश्नासाठी उग्र आंदोलने केली.त्यावेळेस च्या सरकारला दलित हिताचे निर्णय घेण्यासाठी त्यांनी प्रवृत्त केले.मराठवाडा विद्यापीठ नामांतर लढ्यातही त्यांचे मोलाचे योगदान आहे.

तोंड वाजवून न्याय मिळत नसेल तर तोंडात वाजवून न्याय मिळवायचा.माझ्या संघटनेत काम करायचे असेल तर चळवळीत काम करायचं असेल तर मन घट्ट करावे लागेल.मार खायला शिकलं पाहिजे.संघटनेत नीट काम केलं नाही ना तर गांडीवर लात मारून काढून देईन.समाजासाठी काम करता येत नसेल तर चोरी मारी,दरोडेखोरी, बलात्कारी सोडून बाकीचे जे काही पोटापाण्याचे धंदे आहेत ते करा.पैसे मिळवण्याचा धंदा करावा.आणि काही जमलं नाही तर मटका बुकी चा धंदा करा,दारू विका. कोण पोलीस येतो,काय करतो यासाठी मी तुमच्या पाठीमागे आहे.असे आपल्या कार्यकर्त्यांना ते म्हणायचे.बाबासाहेबाचं नाव घ्यायचं, फुलेंचं नाव घ्यायचं आणि आपली पोटाची खळगी भरायची हे धंदे सोडून द्या. असे ते कार्यकर्त्यांना स्पष्टपणे सांगायचे.

अश्या या गरीब,शोषितांचा अन्याय अत्याचाराला आपल्या लेखणीतून वाचा फोडत त्याविरोधात लढणाऱ्या योध्याचा अंत वयाच्या ६४ व्या वर्षी १५ जानेवारी २०१४ रोजी झाला. त्यांच्या जाण्याने आंबेडकरी चळवळीचे आणि दलित पँथर चे न भरून निघणारे नुकसान झालेले आहे. आजही दलित पँथर ही सामाजिक संघटना त्यांना सांगितलेल्या तत्वावर कार्य करत आहे.त्यांचा लढा प्रत्येक ठिकाणी त्यांच्याच पद्धतीने हाताळत आहेत.खऱ्या अर्थाने नामदेव ढसाळ यांनी जाता जाता विद्रोहाची ज्वाला येणाऱ्या पिढीत पेटवली.अन आता अनेक कवी, लेखक, सामाजिक कार्यकर्ते त्यांची प्रेरणा घेऊन अन्यायाला वाचा फोडण्याचे कार्य करत आहेत.

अन्याय अत्याचाराची चिड होता नामदेव  
सामाजिक लढ्याची लीड होता नामदेव  
छिनाल व्यवस्थेला फाट्यावर कोलणारा  
आंबेडकरी चळवळीची ग्रीड होता नामदेव

**विजय नारायण वाठोरे, नांदेड**  
**तालुकाअध्यक्ष - दलित पँथर (नामदेव ढसाळ )संपर्क - ९९७५५९३३५९**

# सामाजिक संस्थांसाठी अनुदान योजना

लातूर, : अल्पसंख्यांक विकास विभागामार्फत २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरिता बौद्ध समाजातील सांस्कृतिक, शैक्षणिक व सामाजिक कार्य राबविणाऱ्या संस्थांना पायाभूत सोयी-सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना राबविण्यात येत आहे. इच्छुक संस्थांनी विहित नमुन्यातील अर्ज सर्व आवश्यक कागदपत्रांसह लातूर जिल्हा नियोजन अधिकारी कार्यालयाकडे २० फेब्रुवारी २०२६ पर्यंत सादर करावेत, असे जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे

राज्यातील धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत आणि संस्थेमध्ये ५१टक्क्यांपेक्षा अधिक बौद्ध समाजातील विश्वस्त, सदस्य असलेल्यासंस्थांसाठी महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्यांक विकास विभागामार्फत२०२५-२६ या आर्थिक वर्षाकरिता बौद्ध समाजातील सांस्कृतिक, शैक्षणिक व सामाजिक कार्य राबविणाऱ्या संस्थांना पायाभूत सोयी-सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत पात्र संस्थांना सांस्कृतिक, शैक्षणिक आणि सामाजिक कार्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा उभारणीसाठी शासनाकडून आर्थिक मदत देण्यात येणार आहे. या योजनेचा उद्देश राज्यातील बौद्ध समाजातील संस्थांचा सर्वांगीण विकास साधणे हा आहे. संस्था राज्यातील धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत असणे आणि संस्थेतील ५१ क्क्यांपेक्षा अधिक विश्वस्त तथा सदस्य बौद्ध समाजातील असणे आवश्यक आहे. योजनेबाबतचे सविस्तर निकष, अटी व शर्ती महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. अविवि-२०२४/प्र.क्र.७५/१५/का.६, दिनांक ०७ ऑक्टोबर २०२४ मध्ये उपलब्धआहेत.

# बालरंगभूमी परिषदेच्या वतीने बाल वक्ता वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन...

लातूर :- बालरंगभूमी परिषद ही बालकांच्या सुप्तकलागुणांना वाव देण्याचे कार्य गेल्या अनेक वर्षांपासून करत आहे. त्याचाच एक भाग म्हणून बाल वक्ता वक्तृत्व स्पर्धे चे आयोजन १ मार्च २०२६ रोजी निश्चय संस्कृत क्लासेस ट्युशन एरिया लातूर येथे सकाळी ११ वाजता करण्यात आले आहे.

वक्तृत्व तथा भाषण हे प्रभावी संवाद कौशल्य माध्यम आहे. यातून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढी साठी आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी प्रभावी उपयोग होतो. याच अनुषंगाने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती चे औचित्य साधून बालरंगभूमी परिषद लातूर आणि निश्चय संस्कृत क्लासेस लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने शालेय स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

हि स्पर्धा तीन गटांमध्ये आयोजित करण्यात आली आहे. यात पहिली ते चौथी साठी या गटासाठी बाल शिवाजी आणि माझा आवडता देशभक्त हे विषय तर पाचवी ते सातवी गटासाठी आजी आजोबा माझे गुगल आणि मोबाईल शाप की वरदान हे विषय असतील तर आठवी ते दहावी गटासाठी डिजिटल युगातही पुस्तकं माझे मित्र आणि आजचा विद्यार्थी उद्याचा भारत असे विषय ठेवण्यात आले आहेत. प्रत्येक स्पर्धकासाठी सादरीकरणाचा वेळ किमान ५ मिनिट कमाल ६ मिनिट असेल. स्पर्धे त नाव नोंदणीची शेवटची तारीख २५ फेब्रुवारी २०२६ असणार आहे. या स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय येणाऱ्यांना बालरंगभूमी परिषदेच्या वतीने सन्मान चिन्ह, प्रशस्तीपत्र दिले जाणार आहे. तसेच प्रत्येक सहभागी स्पर्धकास सहभाग प्रमाणपत्र दिले जाईल. तरी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घ्यावा असे आवाहन बालरंगभूमी परिषद, लातूरच्या वतीने करण्यात आले आहे.

स्पर्धेसाठी संपर्क बालरंगभूमी परिषद, लातूरचे अध्यक्ष रणजित आचार्य ८४४६८६५९०८, प्रमुख कार्यवाह नवलाजी जाधव ७२७६६६२६२७, स्पर्धा प्रमुख वसुधा पाटील ९०९६५९०९८५, कार्यकारिणी सदस्य भिम दुनगावे ९०४९१९११२२, प्रिती ठाकूर ७०५८६०५५७७ आणि महेश बिडवे ९८३४३३८१७६ यांच्याशी करावा.

# श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या दहावीच्या विद्यार्थ्यांचा सदिच्छा समारंभ




लातूर : येथील अभिनव मानव विकास संस्थाद्वारा संचालित श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा सदिच्छा समारंभ नुकताच उत्साहात पार पडला.

यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या भावना व्यक्त करताना विद्यालयात आपल्याला शिक्षणासोबतच जीवनात यशस्वी कसे व्हायचे ? याचेही शिक्षण मिळाल्याचे सांगितले.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.अशोक गानू उपस्थित होते. यांच्या हस्ते डॉ. गानू यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. चेतन सारडा, सचिव कमलकिशोर अग्रवाल, शालेय समितीचे अध्यक्ष अतुल देऊळगावकर, सहसचिव सुभाष कासले, मुख्याध्यापक रमाकांत स्वामी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी शालेय सराव परीक्षेमध्ये बक्षिसपात्र ठरलेल्या समर्थ कल्याण गिरवलकर , कु.समृद्धी वैभव पाटील, अथर्व संतोष मरे , साईनाथ अनिल चामे यांचा पारितोषिक देऊन सन्मान करण्यात आला. तसेच अभिनव गुणवंत विद्यार्थी पुरस्काराने समर्थ गिरवलकर, अथर्व मरे यांचाही डॉ. अशोक गानू यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी मनोगत व्यक्त करताना डॉ. अशोक गानू यांनी विद्यार्थ्यांना तुम्हाला तुमच्या मनाप्रमाणे चांगले शिक्षण मिळालं आहे. पण आजूबाजूला असे अनेकजण आहेत, ज्यांच्यात गुणवत्ता असूनही मनातल्या गोष्टी करायला मिळत नाहीत. अशी व्यक्ती तुम्हाला भेटेल तेव्हा त्या व्यक्तीला कमी लेखू नका. जमेल तसे साह्य करा. तुमच्यामध्ये एखादी कला असेल तर तिची जोपासना करा.

शाळेतील विविध अनुभव, इथं मिळालेलं ज्ञान, माहिती याचा विसर पडू देऊ नका असे सांगून त्यांनी विद्यार्थ्यांना दहावी परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.

शालेय समितीचे अध्यक्ष अतुल देऊळगावकर यांनी यावेळी मनोगत व्यक्त करताना विद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांना सर्वंकष शिक्षण देण्याचे काम केले जाते. विद्यार्थ्यांना अभ्यासासोबतच जीवनात यशस्वी होण्यासाठी आवश्यक असणाऱ्या बाबी अग्रक्रमाने शिकवण्यात येत असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक रमाकांत स्वामी यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी आज अभ्यासात मागे असणारे विद्यार्थी भविष्यात मागेच राहतील असे नाही, जीवनात शालेय जीवनात किती टक्के मार्क मिळाले यापेक्षाही तुम्ही जीवन किती चांगल्या प्रकारे जगता, इतरांशी कसे वागता हे महत्वाचे असते असे सांगितले. विद्यार्थ्यांना शालेय अभ्यासासोबतच एक समाजात आदर्श नागरिक म्हणून जगण्याची शिकवणही दिली जात असल्याचे स्वामी यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांपैकी कु. अपूर्वा झुंजे, कु. नबिहा इनामदार, कु.श्रावणी शेळके, कु. समृद्धी पाटील, कु. समीक्षा मेदगे , कु. ईश्वरी पाटील, अथर्व मरे, समर्थ गिरवलकर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन उत्तरा शहरकर यांनी तर आभार प्रदर्शन पर्यवेक्षिका सुनीता जाधव यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पर्यवेक्षक गिरीश कुलकर्णी, सुनीता जाधव राहुल पांचाळ यासह सर्व शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# सिध्देश्वर यात्रा महोत्सवानिमित्त धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन.



लातूर/प्रतिनिधी : ग्रामदैवत श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी महाशिवरात्रीचे औचित्य साधून यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. १५ फेब्रुवारी ते २ मार्च यादरम्यान पार पडणाजया या महोत्सवात विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेआहे. महोत्सवासाठी आवश्यक असणारी सर्व तयारी अंतिम टप्प्यात आली असून या यात्रा महोत्सवात अधिका अधिक भाविक व नागरिकांना सहभाग नोंदवावा असे आवाहन प्रशासक सचिन जांबूतकर यांच्या विश्वस्तांनी केले आहे.

राज्यभर परिचित असलेल्या लातूर येथील श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर यात्रा महोत्सव महाशिवरात्रीदिनी म्हणजेच दि. १५ फेब्रुवारीपासून सुरु होणार आहे. या महोत्सवानिमित्त शनिवार मध्यरात्री व रविवार पहाटे गवळी समाजाच्या वतीने श्री सिध्देश्वरास दुग्धाभिषेक होणार आहे. यानंतर श्रीच्या दर्शन सोहळ्यास प्रारंभ होणार आहे. रविवारी सकाळी १० वाजता जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर - घुगे यांच्या हस्ते श्रीची महापुजा होवून झेंडावंदनाने यात्रा महोत्सवास प्रारंभ होणार आहे. तसेच संत सावतामाळी भजनीमंडळ व माळी समाजाच्या वतीने माळी गल्ली येथून मिरवणूक निघून पुष्पवृष्टी करण्यात येणार आहे. याच दिवशी म्हणजे रविवार दि. १५ रोजी दुपारी १ वाजता मार्केट यार्ड परिसरातील गौरीशंकर मंदीर येथून पारंपारिक झेंड्यांच्या काठ्याची मिरवणूक निघणार आहे. सदर मिरवणूकीचा समारोप श्री सिध्देश्वर मंदीर येथेहोणार आहे. रात्री ९ ते ११ या दरम्यान हभप श्री संजय महाराज खडक उमरगेकर यांचे किर्तन तर रात्री ११ ते १ या दरम्यान सुरमणी बाबुराव बोरगावकर, व तालमणी रामभाऊ बोरगावकर यांचे संगीत भजन पार पडणार आहे.

सोमवार दि. १६ फेब्रुवारी रोजी विरशैव तेली समाज बांधवांतर्फे श्रीस गंगेच्या पाण्याचा अभिषेक होणार आहे. यादिवशी संध्याकाळी आळंदी येथील हभप श्री माऊली महाराज कदम यांचे किर्तन पार पडणार आहे. मंगळवार दि. १७ फेब्रुवारी रोजी हभप श्री ज्ञानसिंधू संदीपान महाराज हासेगावकर यांचे किर्तन होणार असून बुधवार दि. १८ रोजी हभप श्री गुरुवर्य पुंडलीक महाराज देहूकर यांच्या किर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार दि. १९ रोजी रात्री ९ वाजता हभप श्री गुरुराज महाराज देगलुरकर यांचे तर शुक्रवार दि. २० रोजी पंढरपुर येथील हभप श्री गोपाळअण्णा महाराज वासकर यांचे किर्तन पार पडणार आहे. शनिवार दि. २१ रोजी सायंकाळी ६ ते ८ या दरम्यान हभप गुरुबाबा महाराज औसेकर यांचे चक्रीभजन तर रात्री ९ वाजता हभप विजयानंद महाराज सुपेकर यांचे किर्तन पार पडणार आहे. रविवार दि. २२ रोजी सकाळी ११ ते ४ या दरम्यान १००१ महिलांच्या उपस्थितीत श्रीस रुद्राभिषेक करण्यात येणार आहे. तसेच यावेळी महिलांसाठी विविध स्पर्धांचे आयोजनही केलेले आहे. याच दिवशी रात्री ८ वाजता शिवरुद्र स्वामी यांची संगीत भजनी होणार आहे.

सोमवार दि. २३ रोजी सचिन जाधव व वैष्णवी बरकते यांचे तर मंगळवार दि. २४ रोजी लातूर येथील संतोष थोरात यांचे संगीत भजन पार पडणार आहे. बुधवार दि. २५ रोजी डॉ. दत्ता राजे यांचे संगीत भजन होणार असून गुरुवार दि. २६ रोजी सकाळी ११ वाजता कृषी पदर्शनाचे उद्घाटन पार पडणार आहे. याच दिवशी देवस्थान परिसरात पशु व पक्षी पदर्शनाचे उद्घाटन होणार असून यावेळी उत्कृष्ट पुश व पक्षींची निवड स्पर्धा पार पडणार आहे. या दिवशी रात्री ८ वाजता विठ्ठलराव जगताप यांचे संगीत भजन होणार आहे.

शुक्रवार दि. २७ रोजी सकाळभ ११ वाजता पशु अश्व व श्वान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले असून यावेळी उत्कृष्ट पशु, अश्व व श्वान यांची निवड होणार आहे. या स्पर्धेत निवड झालेल्या पशुंना लातूर बाजार समितीच्या वतीने चांदीचा रथ देण्यात येणार असून पशु मालकास प्रमाणपत्र देवून सन्मानित करण्यात येणार आहे. शनिवार दि. २८ रोजी लातूर येथील सुरमणी भुजंग मुर्के तर रविवार दि. १ मार्च रोजी श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर भजनी मंडळाचा भजन कार्यक्रम संपन्न होणार आहे. रविवार दि. १ मार्च रोजीच देवस्थान परिसरात सकाळी ११.३० पासून कुस्ती स्पर्धांचा फड रंगणार आहे. सोमवार दि. २ मार्च रोजी रात्री ८ वाजता उपविभागीय अधिकारी रोहिणी नजहे यांच्या उपस्थितीत शोभेच्या दारुची आतिषबाजी करून यात्रा महोत्सवाचा समारोप होणार आहे. तसेच याच दिवशी रात्री ९ ते ११ पंडरपुर येथील हभप माधव महाराज शिवणीकर यांचे काल्याचे किर्तन पार पडणार असून यानंतर श्रीची मिरवणूक काढण्यात येणार आहे. तसेच दहीहंडी व महाप्रसादाचे आयोजन यावेळी करण्यात आलेले आहे.

यात्रा महोत्सव १५ दिवस पार पडणार असून यासाठी आवश्यक असणारी सर्व तयारी अंतिम टप्प्यात आलेली आहे. यावर्षी यात्रा महोत्सवात भाविकांसह नागरिकांसाठी विविध आकर्षण राहणार असून आनंद मेळा यासह देवस्थान परिसरात विविध खाद्यपदार्थ व साहित्यांचे स्टॉलही असणार आहे. या यात्रा महोत्सवात लातूर व परजिल्ह्यासह परराज्यातील नागरिक व भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन प्रशासक सचिन जांबूतकर यांच्यासह विश्वस्त विक्रम गोजमगुंडे, श्रीनिवास लाहोटी, प्रदीप राठी, मन्मथ लोखंडे, बाबासाहेब कोरे, अशोक भोसले, नरेश पंड्या, सुरेश गोजमगुंडे, रमेशसिंह बिसेन, चंद्रकांत परदेशी व व्यंकटेश हालिंगे यांनी केले आहे.

रक्तदात्यास थेट दर्शन-यात्रा महोत्सवानिमित्त लातूर येथील डॉ. भालचंद्र ब्लड बँकेच्या वतीने देवस्थन परिसरात महाशिवरात्री दिवशी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे. महाशिवरात्री दिवशी श्री सिध्देश्वराच्या दर्शनासाठी भाविक व नागरिकांची मोठी गर्दी असते त्यामुळे रक्तदान शिबिरात रक्तदान केलेल्या दात्यास थेट दर्शनाचा लाभ देण्यात येणार आहे. त्यामुळे या शिबिरात अधिकाधिक भाविकांनी रक्तदान करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# बोरगाव काळे येथील पाडुरंग देडे या शेतकऱ्यास तब्बल २५ वर्षांपासून शेतरस्ताच नाही !

## पालकमंत्र्यानी तहसीलदार व उपविभागीय अधिकाऱ्यांना झापले!



लातूर : लातूर तालुक्यातील बोरगाव काळे येथील शेतकरी पांडुरंग देडे यांची गट क्र. ३३२ मध्ये चार एकर शेत जमीन आहे. मात्र या शेताला जाण्यासाठी शेत रस्ता मिळावा यासाठी पांडुरंग देडे यांनी तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, पालकमंत्री यांच्याकडे वारंवार अर्ज विनंत्या करूनही अद्याप पर्यंत रस्ता मिळालेला नाही. त्यासाठी लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांना ऑगस्ट २०२५ मध्ये निवेदन दिले होते. आठ दिवसात काम होईल म्हणाले होते. मात्र तहसीलदार आणि उपविभागीय अधिकाऱ्यांनी कोणतीच दखल घेतली नाही. परवा फेब्रुवारी महिन्यात पालकमंत्री लातूरला आले असताना पुन्हा शेतकरी पांडुरंग देडे हे त्यांना विश्रामगृहात जाऊन भेटले. आणि आपली व्यथा सांगितली. तेव्हा पालकमंत्र्यांनी तहसीलदार व उपविभागीय अधिकाऱ्यांना चांगलेच फैलावर घेतले. एका शेतकऱ्याची २५ वर्षांपासूनची समस्या प्रशासनाला सोडवता येत

नाही. ही गंभीर बाब असल्याचे सांगून तात्काळ हे प्रकरण निकाली काढावे,असे निर्देश दिले आहेत.

५ जानेवारी रोजी तहसीलदारांच्या आदेशाने भूमी अभिलेखचे भूमापक आढाव, तलाठी आशुतोष कांबळे,मंडल अधिकारी भुजबळ हेशेतीची हद्द व खुणा करून देण्यासाठी रोजी शेतावर आले. मात्र भुमापक आढाव हे पळून गेले. त्याबाबतचा पंचनामा मंडल अधिकाऱ्याकडून करण्यात आला. शेतत्यासाठी नोटीसा देऊनही आतापर्यंत पाचवेळा असा प्रकार घडला आहे. प्रशासनाकडून ठोस कार्यवाही केली जात नाही, असे शेतकरी पांडुरंग देडे यांनी पालकमंत्र्यांना सांगितले. प्रत्येकवेळी तहसीलदारांच्या आद- शाने मंडल अधिकऱ्या मार्फत नोटीसा देऊनही गैरहजर राहणे आणि पोलीसांचे सहकार्य मिळत नाही.. महसूल विभागाचे

अधिकारी आणि कर्मचारी टाळाटाळ करत आहेत. माझ्या शेताचा शेतरस्ता मिळवून द्यावा, अशी मागणी शेतकरी पांडुरंग देडे यांनी निवेदनद्वारे पालकमंत्र्यांकडे केली आहे. शेत रस्ता न मिळाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा शेतकरी पांडुरंग देडे यांनी दिला.

## नांदूर घाट येथे आर.बी.आय. व उमेद अभियानाअंतर्गत आर्थिक साक्षरता मेळावा संपन्न

केज/प्रतिनिधी-केज तालुक्यातील नांदूर घाट येथे आर.बी.आय.व उमेद अभियानाअंतर्गत महिलांचा आर्थिक साक्षरता मेळावा संपन्न झाला आहे.



केज तालुक्यातील नांदूर घाट हे सर्वात मोठा प्रभाग संघ असून उमेद टीम व बँक अधिकारी,दिनांक १० फेब्रुवारी २०२६ रोजी नांदूरघाट येथे आर.बी.आय.यांच्या मार्फत ई .के. वाय.सी.के. वाय सी.अणि आर्थिक साक्षरता संदर्भात मेळावा घेण्यात आला. या मेळाव्यास आर.बी.आय. चे अधिकारी,एल. डी.म.सर, नाबार्डचे अधिकारी,म.जी. बी. जिल्हा मॅनेजर,म.जी.बी., मॅनेजर,नांदूरघाट व तालुका अभियान व्यवस्थपाक श्रीमती. नंदाताई ओव्हाळ, तालुका व्यवस्थपाक फ.आय.-श्री.चव्हाण सर, तसेच सर्व बँकेतील अधिकारी कर्मचारी, प्रभागातील बचत गटातील सी. आर.पी.ताई,पशुसखी,प्रभाग संघअध्यक्ष,उपाध्यक्ष,सचिव, सदस्य यांच्यासह महिलांची संख्या मोठ्या संख्येने उपस्थित होती.

# सेवालाल महाराजांची जयंती साजरी करा बाळू चव्हाण

बंजारा समाजाचे श्रद्धास्थान असलेले सतगुरु सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त दि १५ फेब्रुवारी बंजारा समाजाने विविध उपक्रम राबवून त्यांची जयंती साजरी करावी असे आवाहन संत सेवालाल महाराज तांडा समृद्धी योजना समिती अशासकीय सदस्य बाळू चव्हाण यांनी केले आहे.



बंजारा समाजाचे श्रद्धास्थान महापुरुष सेवालाल महाराज यांचा जन्म १५ फेब्रुवारी १७३९ ला बंजारा कुटुंबामध्ये गोलार डोडी तांडा ता गुत्ती जी अनतपूर आंध्र प्रदेश येथे झाला.संत सेवालाल महाराज यांची जयंती सर्वांनी मोठ्या उत्साहात साजरी करावी व जयंती निमित्त विविध उपक्रम राबवावेत असे आवाहन संत सेवालाल महाराज तांडा समृद्धी योजना समिती अशासकीय सदस्य बाळू चव्हाण यांनी केले आहे. बंजारा समाजातीलच नव्हे तर इतर सर्व समाजाना एकत्र करण्यासाठी आपल्या जीवनाचा त्याग देणारे, आविष्यभर लग्न न करता गोर गरीबांच्या सेवेसाठी लढणारे, अनेक भाषांचे ज्ञान संपादन करणारे तीन हजार ७५५ गाई गुरासोबत जीवन व्यथित करणारे,आई धर्मळी याडी आणि वडील भीमानायक यांचा आदर्श घेऊन भारत भर प्रवास करणारे, इंग्रजाणां कर न देता इंग्रज्याच्या विरोधात बंड पुकारनारे, हामारा तांडा हामारा राज अशा घोषणा देणारे महान योद्धा क्रांतिकारी समाजसुधारक अर्थशास्त्रज्ञ आयुर्वेदिक ज्ञान असणारे सतगुरु सेवालाल महाराज यांची १५ फेब्रुवारी जयंती असल्यामुळे सर्व तांडा वस्तीमध्ये तसेच शासकिय व निमशासकीय कार्यालयात मोठ्या उत्साहात जयंती साजरी करण्यात यावी,असे आवाहन संत सेवालाल महाराज तांडा समृद्धी योजना समिती अशासकीय सदस्य बाळू चव्हाण यांनी केले आहे.

## ग्रंथालय कर्मचारी विकास परिषद कार्याध्यक्षपदी श्रीधर स्वामी

लातूर : सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेची राज्यस्तरीय बैठक महाराष्ट्र राज्य सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष सदाशिव बेडगे यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी लातुरात उत्साहात पार पडली. या बैठकीत परिषदेच्या कार्याध्यक्षपदी श्रीधर स्वामी यांची तर महिला आघाडीच्या अध्यक्षपदी सौ. वैशाली दुरूगकर यांची निवड करण्यात आली.



सदर बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणे व आपल्या प्रलंबित प्रश्नांसाठी न्याय मिळवून घेणे, तसेच सुकाणू समिती अर्थात कोअर कमिटीबाबत चर्चा झाली, यामध्ये संपूर्ण कार्यकारी मंडळ हेच कोअर कमिटीचे सदस्य राहतील, असे सर्वानुमते ठरले. संघटनेत नविन पदमान्यता घेऊन राज्य महिला अध्यक्ष व कार्याध्यक्ष हे पद भरण्याचे निश्चित करण्यात आले. यावेळी महिला आघाडीच्या राज्यस्तरीय अध्यक्ष म्हणून सौ. वैशाली दुरुगकर यांना तसेच कार्याध्यक्ष म्हणून श्रीधर स्वामी यांना नेमणूक पत्र देण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सन्मानही करण्यात आला.

ही बैठक अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. या बैठकीकडे राज्यातील सर्व ग्रंथालय कर्मचारी व पदाधिकारी यांचे लक्ष लागले होते. बैठकीसाठी राज्याचे अध्यक्ष सदाशिव बेडगे ,सिद्राम मुद्देबिहाळ, वसंत धोत्रे, रामचंद्र वग्गे, धोंडीराम जेऊरकर, राज्य संघटक विद्यासागर हणमंते, मराठवाडा संघटक निळकंठ होनमोडे, मराठवाडा कार्याध्यक्ष मनोहर गायकवाड, परिषदेचे लातूर जिल्हा उपाध्यक्ष सुर्यकांत जाधव, लातूर जिल्हा सचिव संतोष करमले, बालसिंगप्पा ओपळे , नागनाथ नागरगोजे, सौ.नागेश्वरी पांचाळ निवृत्ती सुर्यवंशी, रामानंद स्वामी, दगडू गरड,चंद्रकांत माने यासह मान्यवर उपस्थित होते.

# मराठवाड्याच्या आतिथ्य सुविधांना बळकटी देत 'एनराइज बाय सयाजी'चे लातूरच्या एमआयडीसी परिसरात उद्घाटन






लातूर :-लातूरमधील 'एनराइज बाय सयाजी'मध्ये ३० खोल्या, प्रशस्त बँक्वेट हॉल्स आणि आधुनिक भोजन व्यवस्था औद्योगिक पट्ट्याच्या मध्यवर्ती ठिकाणी समकालीन बिझनेस हॉस्पिटॅलिटीचा नवा अनुभव

लातूर (महाराष्ट्र), १३ फेब्रुवारी २०२६: लातूर शहरातील वाढत्या औद्योगिक 'ओल्ड एमआयडीसी' परिसरात 'एनराइज बाय सयाजी लातूर'ने आपली सेवा सुरू केली आहे. महाराष्ट्रातील मराठवाडा प्रदेशातील आतिथ्य क्षेत्रासाठी हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. ३० खोल्यांचे हे हॉटेल लातूरला देशातील वेगाने विकसित होणाऱ्या टियर-२ शहरांमध्ये स्थान मिळवून देणाऱ्या औद्योगिक आणि व्यावसायिक पट्ट्याच्या गरजा पूर्ण करण्यासाठी सज्ज आहे.

२०११ च्या जनगणनेनुसार २४.५४ लाख लोकसंख्या असलेल्या लातूर जिल्ह्याने मराठवाड्यातील एक महत्त्वाचे व्यावसायिक केंद्र म्हणून आपली ओळख निर्माण केली आहे. देशातील प्रमुख सोयाबीन व्यापार केंद्रांपैकी एक असलेले लातूर तसेच ११ सहकारी साखर कारखान्यांमुळे महाराष्ट्राची साखर पट्टी म्हणूनही ओळखले जाते. या मजबूत औद्योगिक पायाभूत सुविधांमुळे दर्जेदार व्यावसायिक आतिथ्य सेवांची सातत्यपूर्ण मागणी निर्माण झाली आहे.

'एनराइज बाय सयाजी लातूर' मध्ये व्यवसाय व विरंगुळ्यासाठी प्रवास करणाऱ्या पाहुण्यांसाठी तीन श्रेणींमध्ये एकूण ३० खोल्यांची सुविधा उपलब्ध आहे१८ डिलक्स रूम्स, ९ एक्झिक्युटिव्ह रूम्स आणि ३ प्रीमियम एक्झिक्युटिव्ह रूम्स. प्रत्येक खोली आधुनिक सुविधा आणि आरामदायी रचनेने सज्ज आहे.

याशिवाय, येथे विविध आकारांचे चार प्रशस्त बँक्वेट हॉल्स उपलब्ध असून ते बोर्ड मिटिंग्स, प्रशिक्षण सत्रे, मोठ्या परिषदांपासून सामाजिक समारंभांपर्यंत सर्व कार्यक्रमांसाठी उपयुक्त आहेत. 'ज्वेल' हा सर्वात मोठा हॉल थिएटर शैलीत सुमारे ७०० पाहुण्यांची क्षमता असलेला आहे. 'सॉलिटेअर' मध्यम आकाराच्या कार्यक्रमांसाठी, 'क्रिस्टल' कॉर्पोरेट बैठका आणि समारंभांसाठी, तर 'कनेक्ट' हा छोट्या चर्चांसाठी सुसज्ज बोर्डरूम आहे.

निवास आणि कार्यक्रम सुविधांना पूरक म्हणून 'मोमेंट्ट' आणि 'होरायझन' ही दोन मल्टी-क्युजिन रेस्टॉरंट्स उपलब्ध असून, निवासी पाहुणे, व्यावसायिक प्रवासी आणि स्थानिक खाद्यप्रेमींसाठी आधुनिक भोजनाचा अनुभव देतात.

लातूर हे आमच्या धोरणात्मक विस्तार दृष्टीकोनाशी सुसंगत असे उच्च क्षमतेचे बाजारपेठ आहे. मराठवाडा प्रदेशात आमची 'र्धेीी ढ्रीश्रू' सेवा परंपरा आणत शहराच्या विकसित होत असलेल्या आतिथ्य गरजा पूर्ण करण्यासाठी एपीळीश लू डूरक्षळ, डर्ीीी ची रचना करण्यात आली आहे, असे सयाजी हॉटेल्सचे असोसिएट जनरल मॅनेजर श्री. राजेंद्र जोशी यांनी सांगितले.

गर्जे सोलर इन्फ्राचे व्यवस्थापकीय संचालक श्री. मयूर गर्जे म्हणाले, लातूर जिल्ह्याचे व्यापारी केंद्र म्हणून झालेले परिवर्तन आम्ही प्रत्यक्ष अनुभवले आहे. या गतिमान व्यावसायिक परिसंस्थेसाठी दर्जेदार आतिथ्य सुविधा निर्माण करण्याची संधी आम्ही ओळखली. सयाजी हॉटेल्ससोबतच्या भागीदारीमुळे आमच्या शहरात जागतिक दर्जाच्या सुविधा आणि सेवा मानके आणता आली आहेत.

ओल्ड एमआयडीसी परिसरात स्थित असल्यामुळे हॉटेलला प्रमुख औद्योगिक वसाहती आणि वाहतूक केंद्रांशी उत्तम जोडणी लाभली आहे. लातूर रेल्वे स्थानकापासून हे हॉटेल सुमारे ३ किमी अंतरावर असून सोलापूर विमानतळापासून १२० किमी अंतरावर आहे, ज्यामुळे उत्पादन व प्रक्रिया उद्योगांशी संबंधित व्यावसायिक प्रवाशांसाठी सोयीस्कर प्रवासाची सुविधा उपलब्ध होते.

'एनराइज बाय सयाजी लातूर'चे उद्घाटन हे ब्रँडच्या उच्च क्षमतेच्या विकास बाजारपेठांमध्ये विस्तार करण्याच्या सातत्यपूर्ण धोरणाचे प्रतीक आहे. उदयोन्मुख व्यावसायिक शहरांच्या आतिथ्य गरजा पूर्ण करताना लातूरला व्यापार, कार्यक्रम आणि आधुनिक शहरी अनुभवांचे केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी हे हॉटेल महत्त्वाची भूमिका बजावेल.

# पंचपरिवर्तनाच्या माध्यमातून वैभवशाली समाज घडवायचा आहे : प्राचार्य पांडे

लातूर : आजघडीला कुटुंबाची अवस्था 'अस्वस्थ मन आणि उध्वस्त अंगण ' अशी झाली आहे. कर्तव्याचे पालन करणारी कुटुंब व्यवस्था खूप महत्वाची आहे. त्याकरिता कुटुंब प्रबोधनही महत्वाचे असून पंचपरिवर्तनाच्या माध्यमातून वैभवशाली समाज घडवणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन परभणीच्या मराठवाडा कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य अनंतराव पांडे यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे व नवनिर्माण प्रतिष्ठान, लातूरच्या संयुक्त विद्यमाने लातुरात आयोजित करण्यात आलेल्या नवनिर्माण व्याख्यानमाला - २०२६ चे द्वितीय पुष्प गुरुवारी सायंकाळी प्राचार्य पांडे यांनी ' पंचपरिवर्तनातून सामर्थ्यशाली समाज व वैभवशाली राष्ट्रनिर्मिती ' या विषयावर गुंफले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून अष्टांग योग केंद्राचे संचालक योगाचार्य दिलीपराव भातलवंडे उपस्थित होते. मंचावर नवनिर्माण प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रवीण सरदेशमुख, कार्यवाह अशोक शिवणे , उमेश कुलकर्णी आदी मान्यवरांची उपस्थिती होती. बदलत्या काळात मोबाईल ही अत्यावश्यक वस्तू बनली असली तरी किमान काही काळासाठी तरी प्रत्येकाने आपल्यापासून मोबाईल दूर ठेवण्याचा प्रयत्न करावा. किमान रात्रीचे जेवण कुटुंबातील सर्व सदस्यांनी एकत्रित मिळून करावे. आजमितीस घरातही मोबाईल पार्किंग स्टेशन असणे आवश्यक आहे. म्हणजे जेवताना सगळ्यांचे फोन तेथे ठेवता येईल. कुटुंब प्रबोधनासाठी हे अतिशय आवश्यक असल्याचे प्राचार्य अनंतराव पांडे यांनी सांगितले.




आपल्या व्याख्यानात प्राचार्य पांडे यांनी पंचपरिवर्तनाच्या माध्यमातून विचारांचे जागरण केले जाणार आहे. निसर्गाचे बिघडलेले चक्र पर्यावरण संवर्धन करून व्यवस्थित करायचे आहे. विषयुक्त अन्न निर्माण न करता, विषमुक्त अन्न निर्माण करायचे आहे.गुणी समाज निर्माण करण्यासाठी स्वबोध स्पष्ट असावा यात स्वभाषा, स्वभोजन, स्वभवन, स्वगृह, स्वभ्रमण हे स्वदेशी विचाराच्या माध्यमातून करायचे आहे.संतांनी शिकवलेली सामाजिक समरसता आपल्या विचारातून, प्रत्यक्ष कृतीत उतरवायची आहे.पंचपरिवर्तनाच्या माध्यमातून चरित्र, चारित्र्य निर्माण करून बलशाली, वैभवशाली राष्ट्र घडवण्याचे स्वप्न पूर्ण करायचे आहे,अशा अनेक महत्वपूर्ण बाबी विशद केल्या. सद्यस्थितीत जगातले १८ टक्के लोक कोणत्या ना कोणत्या कर्करोगाने बाधित झालेले पाहायला मिळतात. हा प्रकार विषयुक्त अन्न आणि पर्यावरणाच्या वैश्विक समस्येमुळे घडतो. वैश्विक समस्येचे निराकरणही पंचसूत्रीच्या माध्यमातून करणे शक्य होते. निसर्गाचा समतोलही साधने महत्वाचे आहे. त्यासाठी प्लास्टिकचा वापर कटाक्षाने टाळण्याचा प्रयत्न प्रत्येक जागरूक व्यक्तीने केलाच पाहिजे. पर्यावरणाचा समतोल साधण्यासाठी सेंद्रिय शेतीचा पर्याय सर्वोत्तम ठरू शकतो. शेतीच्या मातीचा पोत सुधारण्यासाठी देशी गाय पाळणे गरजेचे आहे. तसेच प्रत्येकाच्या घरात एकतरी देशी वृक्ष असावा, पाण्याच्या पुनर्वापराची जनजागरण मोहीम राबवणे आवश्यक असल्याचे प्राचार्य पांडे यांनी स्पष्ट केले.

आपले भारतीय आयुर्वेद शास्त्र अतिशय प्राचीन आहे. भारतात साडेसातशे वर्षांपूर्वी बायपास सर्जरी सुविधा असल्याचा उल्लेख चरकसंहितेत आढळून येतो. जगाला प्रगतीपथावर नेणारी विमान संकल्पनाही भारताचीच आहे. आजच्या स्थितीत समाजाच्या भरकटलेल्या जहाजाचे होकायंत्रही भारतमाता असल्याचे पांडे यांनी सांगितले.

प्रमुख अतिथी म्हणून आपले विचार व्यक्त करताना योगाचार्य भातलवंडे यांनी नवनिर्माण प्रतिष्ठानचे कार्य आजच्या स्थितीत अतिशय मौलिक आणि राष्ट्रनिर्मितीच्या कार्यात महत्वपूर्ण योगदान देणारे असल्याचे सांगितले. यासाठी नवनिर्माण प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी अभिनंदनास पात्र असल्याचे सांगून त्यांनी सर्व पदाधिकाऱ्यांना मंचावर पाचारण करून त्यांचा सन्मान केला. संतोष बीडकर यांनी वैयक्तिक पद्य सादर केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन धनंजय कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमास विविध स्तरातील मान्यवरांची उपस्थिती होती.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर - ४१३५१२ येथे प्रकाशित केले.